Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक २३वा शुभ दिपावली ऑक्टोबर २०२३

## आमचे ध्येय

**अनेक पिढ्यांपासून चालत आलेले दारिद्र्य-चक्र तोडून एकेक व्यक्तीला सक्षम बनविणे**

गेल्या अठरा वर्षांपेक्षा जास्त कालावधीत आम्ही ५,४८,०३९ हून अधिक ग्रामीण भारतीयांचे जीवन प्रभावित करण्यात यशस्वी ठरलो आहोत. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. अश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त, श्रीमती विली डॉक्टर यांना २०२३ च्या महात्मा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांना दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी इंडिया इंटरनॅशनल सेंटर, लोधी रोड, नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या समारंभात ''लीडरशिप इन सोशल रिस्पॉन्सिबिलिटी, सोशल गुड अँड इम्पॅक्ट'' या मानाच्या महात्मा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जागतिक स्तरावर प्रभावी सामाजिक बदल घडवून शाश्वत भविष्याचा मार्ग खुला करण्यासाठी झटणाऱ्या जगातील अग्रणी व्यक्तींना महात्मा पुरस्काराने गौरविण्यात येते.



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या 'एक धाव शिक्षणासाठी २०२३' या आंतरराष्ट्रीय आभासी मॅरेथॉनचे अभूतपूर्व यश



दि. १३ ते दि. १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने द्वितीय आंतरराष्ट्रीय आभासी मॅरेथॉनचे यशस्वी आयोजन केले.

दि. १३ ऑगस्ट रोजी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात पहिले प्रत्यक्ष मॅरेथॉन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ५०० हून अधिक धावपटू सहभागी झाले होते. या प्रसंगी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर, कर्जतच्या महापौर श्रीमती सुवर्णा जोशी यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची सर्व केंद्रे तसेच देश-विदेशातील इतर भागातील धावपटूंनी या मॅरेथॉनमध्ये भाग घेऊन शैक्षणिक कार्यासाठी पाठींबा दर्शविला.







ओम्नीकॉम मीडिया ग्रुप (मुख्य प्रायोजक), नवभारत (मीडिया पार्टनर), रेडिओ सिटी ९१.१ एफएम (रेडिओ पार्टनर), फिजिओ रिहॅब (फिजिओ पार्टनर) आणि आयटीएम युनिव्हर्सिटी (सपोर्टिंग पार्टनर) यांनी या मॅरेथॉनला प्रायोजकत्व दिले होते. ३९१ मॅरेथॉन धावलेल्या श्री विठ्ठल कांबळे यांनी कर्जत येथे मॅरेथॉनमध्ये धाव घेऊन संस्थेच्या कार्याला पाठिंबा दर्शविला. यावर्षी संस्थेच्या या मॅरेथॉनसाठी ७५०० हून अधिक लोकांनी नोंदणी केली होती.



| OMG OmnicomMediaGroup | Navābharat नवभारत नवराष्ट्र | 91.1 FM Radio City | Physio Rehab | ITM University |
| --- | --- | --- | --- | --- |
| Main Sponsor | Media Partner | Radio Partner | Physio Partner | Supporting Partner |

## गुरुपौर्णिमा उत्सव साजरा



दिनांक २ जुलै रोजी सत्यवती अध्यात्मिक फाऊंडेशनने ब्यू मॉन्द टॉवर, मल्टीपर्पज हॉल, मुंबई येथे गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी संस्थेच्या विश्वस्त श्रीमती गायत्री रुईया, श्री पुनित बी आनंद आणि श्री अश्विन डॉक्टर यांच्या उपस्थितीत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या १३ आनंदो प्लस लाभार्थ्यांना, त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सन्मानित करण्यात आले.

**आनंदो प्लसच्या खालील लाभार्थ्यांना याप्रसंगी सन्मानित करण्यात आले :**

- ★ श्री. भानुदास श्रीरंग चव्हाण, कोंदिवडे केंद्र, बी. कॉम, तबला प्रथमा, संस्थेमध्ये तबला शिक्षक म्हणून कार्यरत.
- ★ श्रीमती अलिशाबा प्रकाश उजगरे, खोपोली केंद्र, मानसशास्त्रात एम.ए., संस्थेमध्ये संशोधन सहाय्यक म्हणून कार्यरत.
- ★ श्री. विपुल दिलीप हिसाळके, नेरळ केंद्र, द्वितीय वर्ष, L.L.B., सिटी एंटरप्रायझेस कन्स्ट्रक्शन येथे व्यवस्थापक पदावर कार्यरत.
- ★ श्रीमती रोशनी अभिमन्यू अलीमकर, नेरळ, बी.एस्सी. ऑप्टोमेट्री, टायटन आय येथे ऑप्टोमेट्रीस्ट.
- ★ श्रीमती सृष्टी अजय राजगुरू, नेरळ, ललित कला शाखेतील पदवीधर, बीआरडीएस संस्थेत कला शिक्षिका म्हणून कार्यरत.
- ★ श्रीमती कांचन पांडुरंग बईकर, एम कॉम., नेरळ, लाईट ऑफ लाईफ संस्थेमध्ये शिक्षिका आहेत तसेच स्वतःचे क्लासेस देखील चालवत आहेत.
- ★ श्रीमती अक्षता अशोक राऊत, चोंढी, एम एस्सी., युनिफीडर प्रायव्हेट लिमिटेड येथे कार्यरत.
- ★ श्री सक्षम संतोष म्हात्रे, चोंढी, एम.बी.ए., पिरो अल्फा रिसर्च प्रा.ली. येथे कार्यरत.
- ★ श्री कुमार नथुराम म्हात्रे, वळके, डिप्लोमा इन मेकॅनीकल पॉलीटेक्निक, महिंद्रा अँड महिंद्रा येथे कार्यरत.
- ★ श्री सनी राजेंद्र सावंत, वळके, बी.एस्सी. हॉस्पिटालिटी मॅनेजमेण्ट, प्राइमर श्री मुंबई येथे शेफ म्हणून कार्यरत.
- ★ डॉ. सावित्री राठोड, अलिबाग, बी.एच.एम.एस., जीवन ज्योती हॉस्पिटल, कामोठे येथे वैद्यकीय अधिकारी.
- ★ श्रीमती शालिनी सुभाष वढवळ, माणगाव, बी.टेक. इलेक्ट्रोनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन, कॅपजेमिनी टेकनोलोजी सर्विसेस इंडिया लिमिटेड येथे विश्लेषक म्हणून कार्यरत.
- ★ श्री राहुल युवराज जाधव, अलिबाग, डिप्लोमा इन फायर अँड सेफ्टी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे फायरमन म्हणून कार्यरत.







या कार्यक्रमात अनंत प्रकल्पातील गायनाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांसोबत, संस्थेच्या संस्थापक आदरणीय श्रीमती विली डॉक्टर यांच्या समोर गीत गायन सादर केले. आनंदोच्या विद्यार्थ्यांनी गुरू-शिष्य नाते दर्शवणारी 'गुरु शिष्य की कथा' हा नाट्यप्रवेश साकारला.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या विद्यार्थ्यांची अभिमानास्पद कामगिरी.



वाशिम जिल्ह्यातील मानोरा केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थी **श्री शिवम श्रवण** हा महाराष्ट्र पोलीस, सोलापूर येथे पोलीस दलात भरती झाला आहे. एकल पालक मूल असणाऱ्या शिवम याने कला शाखेची पदवी पूर्ण करून नंतर पोलीस कॉन्स्टेबल परीक्षेची तयारी केली होती. ही परीक्षा यशस्वीरित्या पास झाल्यावर त्याची नियुक्ती पोलीस दलात झाली.



वाशिम जिल्ह्याच्या शेंदुरजना केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थी, **श्री लक्षदीप गणेश जाधव,** चंद्रभागा पोद्दार लर्न शाळा, दिंद्रुड, बीड येथे उपमुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. पुणे येथून बीसीए पूर्ण केल्यानंतर त्याने आय टी कोर्स पूर्ण केला. दोन वर्षांपूर्वी त्यांच्या वडिलांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. आर्थिक परिस्थिती कठीण असूनही आपल्या ध्येय्यापासून विचलित न होता त्यांनी शिक्षण सुरू ठेवले. तो सध्या दर महा रू.३८,०००/– उत्पन्न मिळवून त्याच्या संपूर्ण

वाशीम जिल्ह्यातील मानोरा केंद्रातील आनंदो प्लस लाभार्थी **श्री प्रकाश शिंदे**, मुंबई मंत्रालय येथे रेव्हेन्यू असिस्टंट म्हणून कार्यरत आहेत. प्रकाशने एमएसपी सीनियर कॉलेज, मानोरा येथून विज्ञान शाखेची पदवी मिळविली. गेली तीन वर्षे प्रकाश स्पर्धा परीक्षांची तयारी करत होता. परिश्रम आणि चिकाटीमुळे तो एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाला आणि त्याने चांगली नोकरी मिळविली.



वाशीम जिल्ह्यातील मानोरा केंद्रातील आनंदो प्लस लाभार्थी **श्री रवी बडवे** हे ब्राइट आउटडोअर मीडिया प्रायव्हेट लिमिटेड मुंबईत तंत्रज्ञ म्हणून रुजू झाले आहेत. त्यांनी बी.ए. पूर्ण केल्यानंतर नागरी बांधकाम विषयातील पदविकेचा तांत्रिक अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर चित्रपट उद्योगात प्रभावीपणे काम करता यावे म्हणून इतर तांत्रिक कोर्स पूर्ण केले व स्वत:ला सक्षम बनविले.






कर्जत तालुक्यातील आनंदो प्लसचा एक दृढनिश्चयी, मेहनती, महत्वाकांक्षी आणि उत्साही विद्यार्थी म्हणजे **श्री अर्जुन लाड.** शारीरिकदृष्ट्या अपंग असूनही त्याने आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी खूप मेहनत घेतली. नेवाळे या दुर्गम भागात अर्जुन राहतो. शाळेसाठी त्याला रोज ४ किलोमीटर अंतर पार करावे लागत असे. खोपोली येथील केएमसी कॉलेजमधून त्याने यशस्वीरित्या बीकॉम केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर अर्जुनने कर्जतमध्ये स्वत:चे डिजिटल सेवा केंद्र उघडले. संस्थेबद्दल बोलताना अर्जुन म्हणतो की लाईट ऑफ लाईफ ट्रस्टमध्ये मिळालेल्या मार्गदर्शन आणि प्रेरणेमुळेच त्याला त्याचे स्वप्न पूर्ण करता आले आणि हे यश मिळवता आले.



वाशिम जिल्ह्यातील आनंदो प्लस लाभार्थी **श्री. सुमेध तायडे**, मंगरूळपीर येथे महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागात पशुधन पर्यवेक्षक म्हणून दर महा रु. २५,००० मानधनावर कार्यरत आहे. त्याने मालेगाव, वाशिम येथून बारावी सायन्स आणि पशुसंवर्धन विषयातील डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले.

धडगाव तालुक्यातील बोरवण येथील आनंदो प्लस विद्यार्थी **श्री. राहुल रमेश पवारा** याने CUET (UG) उत्तीर्ण होऊन एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आणि दिल्लीच्या सर्वोत्तम पाच विद्यापीठांपैकी एकात आपली जागा निश्चित केली आहे. UPSC परीक्षा उत्तीर्ण करणे हे त्यांचे अंतिम ध्येय आहे. अत्यंत गरीबी ते राज्यशास्त्राचे उच्च शिक्षण घेण्यापर्यंतचा हा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मार्गदर्शनामुळेच राहुल यशस्वीपणे आपल्या ध्येयाकडे वाटचाल करू शकला.



ग्रामीण मुलांच्या जीवनात बदल घडवून आणण्याचे हे कार्य सातत्याने सुरु ठेवण्यासाठी युनायटेड वे ऑफ मुंबई या पोर्टलवर टाटा मुंबई मॅरेथॉन २०२४ येथे आमच्या संस्थापक, श्रीमती विली डॉक्टर यांच्या निधी उभारणीसाठी पाठींबा द्या.

Follow the link to support
https://bit.ly/VillyDoctorTMM24
या लिंक ला फॉलो करा.
किंवा हा QR कोड स्कॅन करा.



TATA MUMBAI MARATHON
TATA CONSULTANCY SERVICES
2024

## आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाची विविध राज्यात सुरुवात







**लॉयड्स इन्फिनीट फौंडेशन फॉर एज्युकेशन (LIFE) यांच्यासह भागीदारीत घुग्गुस, चंद्रपूर तालुका, चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य**

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने लॉयड्स इन्फिनिट फौंडेशन फॉर एज्युकेशनच्या सहकार्याने महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम (अडएझ) सुरू केला. हा उपक्रम प्रियदर्शनी कन्या विद्यालय, घुग्गुस, न्यू इंग्लिश हायस्कूल, पांढरकवडा आणि इंदिरा गांधी विद्यालय, पडोली या तीन शाळांमध्ये राबविण्यात येईल, ज्यामध्ये ७३४ विद्यार्थी आणि २१ शिक्षक समाविष्ट असतील.

दिनांक १८ व १९ जुलै २०२३ रोजी ३ शाळांमध्ये या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री संजय कुमार, गटप्रमुख, घुग्गुस यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी श्री प्रशांत पुरी, उपाध्यक्ष, मुंबई; पवन मेश्राम, एचआर मॅनेजर, घुग्गुस; कु. नम्रपाली गोंडाणे, सी एस आर प्रमुख, मुंबई; आणि श्री तरुण केशवानी, श्री रतन मेहता, आणि लॉयड्स मेटल्सचे श्री आदित्य सिंग, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे शिक्षण विभाग प्रमुख श्री सुधीरकुमार गजभिये, श्रीमती कांचन थोरवे, व्यवस्थापक - आनंदो आणि शाळा सक्षमीकरण कार्यक्रम लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, चंद्रपूर टीम इत्यादी उपस्थित होते.

एकाच दिवशी तीनही शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा आणि ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर पाहुण्यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. उद्घाटनासाठी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विशेष मान्यवर उपस्थित होते.

**तालुका कुकरमुंडा, जिल्हा तापी, गुजरात राज्य**

गुजरात राज्यात, तालुका कुकरमुंडा, तापी जिल्हा येथे आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला, या अंतर्गत श्री सरस्वती विद्यालय आणि शेठ एस.के. कपाडिया विद्यालय या २ शाळांमधील मुले आणि शिक्षक समाविष्ट आहेत.


दि. १२ सप्टेंबर २०२३ रोजी शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे श्री. सुधीरकुमार गजभिये, शिक्षण प्रमुख, श्रीमती कांचन थोरवे, व्यवस्थापक - आनंदो व शाळा सक्षमीकरण कार्यक्रम, कुकरमुंडा टीम यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. संगणक प्रयोगशाळा आणि विज्ञान प्रयोगशाळांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते एकाच दिवशी करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.




## श्री संत लक्ष्मण महाराज विद्या मंदिर कवडगाव, अहमदनगर येथे होगनास इंडिया प्रा.ली. यांच्या सहयोगाने, नवीन विज्ञान कक्ष व प्रयोगशाळेचे उद्घाटन



दि. २८ जुलै २०२३ रोजी नव्याने बांधलेल्या सुसज्ज विज्ञान कक्षाचे उद्घाटन, श्री विनय शिंदे (संचालक एचआर आणि कम्युनिकेशन, होगनास इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), श्री अभिषेक कोल्पेक (व्यवस्थापक एचआर आणि प्रशासक, होगनास इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), श्री शैलेंद्र खलाडकर (व्यवस्थापक एचआर आणि ॲडमिन, होगनास इंडिया प्रायव्हेट लिमिटेड), शाळेचे पदाधिकारी,



ग्रामस्थ मंडळी आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट टीममधील इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. नव्याने बांधलेल्या सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विज्ञान प्रयोगांद्वारे विषयाचे ज्ञान मिळविता येणार आहे. यापूर्वी शाळेत अशा सुविधेचा अभाव होता.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची प्रशिक्षण भागीदार म्हणून नियुक्ती



शहापूरमधील ४४ माध्यमिक शाळांसोबत अनन्या फाउंडेशन आपल्या शैक्षणिक उपक्रमाद्वारे काम करत आहे. अनन्या फाउंडेशनने नियुक्त केलेल्या शिक्षकांचे गणित विषयातील सर्वंकष प्रशिक्षण करणे तसेच शालेय स्तरावर दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यासाठी, शाळांमधील शिक्षकांची विविध आवश्यक विषयांसाठी क्षमता बांधणी करणे दोन महत्त्वाच्या बाबींचा समावेश केला जाईल.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची प्रशिक्षण भागीदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याअंतर्गत, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट टीम, गणितासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांना व शालेय शिक्षकांना अध्यापनशास्त्र, वर्ग व्यवस्थापन आणि इतर बाबींचे प्रशिक्षण देईल. यामुळे शालेय स्तरावर दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.

गणितासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांचे पहिले प्रशिक्षण दि. ४ व दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये २३ शिक्षक सहभागी झाले होते. नियुक्त केलेल्या शिक्षकांचे स्तर मोजण्यासाठी त्यांची पूर्व चाचणी देखील घेण्यात आली. दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी शहापूर येथे शाळेच्या मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन सत्र, श्री. चव्हाण, गटशिक्षण अधिकारी (बीईओ) शहापूर, श्री. मुखर्जी, मुख्य कार्यकारी अधिकारी, अनन्या फाउंडेशन आणि श्री. सुधीकुमार गजभिये, शिक्षणविभाग प्रमुख, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, या मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या सत्रासाठी एकूण ३९ शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

## शालेय साहित्य वाटप कार्यक्रम



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान आणि ओडिशा राज्यांमध्ये चालवल्या जाणार्या सर्व केंद्रांवर वार्षिक शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत ३९७८ आनंदो लाभार्थी, २१०० आनंदो प्लस लाभार्थी, २५८३ आनंदो शाळा सक्षमीकरण प्रकल्पाचे लाभार्थी यांचा समावेश होता.

## पर्यावरण संवर्धन :
## फळ देणार्या वनस्पतीचे वितरण :



**अल कार्गो लॉजिस्टिक ली. यांच्या सहयोगाने, पर्यावरण संवर्धन कार्यक्रमांतर्गत ३०००० फळझाडांच्या रोपांचे वाटप करून अतिरिक्त ६०० शेतकर्यांना मदत करण्यात आली.**

जुलै-ऑगस्ट महिन्यात कर्जत तालुक्यातील २९ गावांतील ६०० शेतकऱ्यांना फळझाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. अल कार्गो लॉजिस्टिक्स लिमिटेड यांच्या सहयोगाने गेल्या ८ वर्षात ५६७७ शेतकऱ्यांना मदत करण्यात आली आहे.

**पर्यावरण संवर्धन: नवीन भागीदारी अंतर्गत रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका व ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील २१ गावांतील ५४० शेतकऱ्यांना १०६०० फळझाडांच्या रोपांचे वितरण करण्यात आले.**

- दि. २ जुलै: ऑटोडेस्क इंडिया प्रा. लि. - २०० शेतकरी – प्रत्येक शेतकऱ्याला २० रोपे.
- दि. ३ जुलै: एव्हरेस्ट कांटो - ३०० शेतकरी - प्रत्येक शेतकऱ्याला २० रोपे.
- दि. ३१ जुलै: रॅलिस इंडिया लि. - ४० शेतकर

## जागतिक ओ.आर.एस. (जलसंजीवनी) साप्ताह साजरा.




दि. २९ जुलै रोजी ओ.आर.एस दिन आणि २५ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत ओ.आर.एस(जलसंजीवनी) सप्ताह साजरा केला जातो. कर्जतच्या लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट फिरत्या दवाखान्याच्या टीमने डोंगरपाडा येथील आश्रम शाळा येथे जागतिक ओ.आर.एस (जलसंजीवनी) सप्ताह साजरा केला. व्हिडिओ आणि पॉवर पॉइंटच्या माध्यमातून ३१९ विद्यार्थ्यांना ओ.आर.एसचे महत्त्व सांगून जनजागृती सत्र घेतले.

दि. २७ जुलै रोजी मुरबाड येथील फिरत्या दवाखान्याच्या टीमने जागतिक ओ.आर.एस(जलसंजीवनी) सप्ताहानिमित्त अनुदानित आश्रम शाळा, वलिहवरे येथील ११७ विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्र आयोजित केले होते

# शुभ दिपावाली




## आमच्या भागधारकांची संस्थेच्या कार्यालयाला भेट:



दि. २२ ऑगस्ट २०२३ रोजी डी. एल. शाह ट्रस्टचे सी.ई.ओ श्री. खुशरू खंबाटा, डी.एल. शाह ट्रस्टचे विश्वस्त श्री. गुर सरूप (माजी ऑडिट मॅनेजर, इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ क्लासिफिकेशन सोसायटी), श्री. एस.एम. पठानिया (माजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य), श्री के. के. नोहरिया (माजी अध्यक्ष आणि एम.डी., क्रॉम्प्टन ग्रीव्हज लिमिटेड), श्री बलदेव राज अरोरा (माजी अध्यक्ष, एशिया आणि पॅसिफिक रिम, वायथ न्यूट्रिश दिली. या भेटीदरम्यान पाहुण्यांनी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त, श्रीमती विली डॉक्टर, सी.ई.ओ. श्री. रमेश दासवानी, सी.ओ.ओ. श्रीमती कमल दमानिया यांच्यासोबत बैठक घेतली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सोबत एकत्रितपणे कोणकोणत्या क्षेत्रात काम करता येईल या शक्यतांवर या बैठकीत चर्चा झाली.

## फायझर लि. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे प्रदर्शन :



फायझर लिमिटेड, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स यांच्या सहकार्याने लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने लाभार्थ्यांनी बनवलेल्या राख्या आणि दागिन्यांच्या विक्रीसाठी दि. ३० ऑगस्ट व दि. १ सप्टेंबर रोजी स्टॉल लावला होता. या वेळी मोठ्या प्रमाणावर विक्री झाली. विक्रीतून मिळालेली रक्कम लाभार्थ्यांसाठी वापरण्यात येईल.

## उपविभागीय दंडाधिकारी, तालुका बिजोलीया, राजस्थान यांच्या कडून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या राजस्थान टीमचा गौरव:

दि. १५ ऑगस्ट २०२३ रोजी, स्वातंत्र्यदिनी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका बिजोलिया, राजस्थान यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, राजस्थान टीम यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेतली व त्यांना पुरस्काराने गौरविले.



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा उत्पादन विभाग :



कर्जत, मुरबाड, शिवार– अकोला आणि तळोदा– नंदुरबार या केंद्रांमधील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या उत्पादन विभागातील महिलांनी यावर्षीच्या शैक्षणिक वर्षाच्या कर्जत, मुरबाड, शिवार– अकोला आणि तळोदा– नंदुरबार या केंद्रांमधील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या उत्पादन विभागातील महिलांनी यावर्षीच्या शैक्षणिक वर्षाच्या

## संपर्कासाठी पत्ता :

**मुख्य कार्यालय :**
वन बीकेसी, सी – विंग, युनिट नंबर : १५१९, प्लॉट नं. : सी–६६,
जी – ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई),
मुंबई – ४०० ०५१ . संपर्क क्र. : +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल : connect@lightoflifetrust.org

**शाखा कार्यालये :**

**महाराष्ट्र :** • अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ

**गुजराथ :** • कुकरमुंडा **मध्य प्रदेश :** • सिवनी

**राजस्थान :** • बिजोलिया • सिकार **ओडिशा :** • अंगुल

www.lightoflifetrust.org    +91-9820 689 131

@LightOfLifeTrustIndia    @lightoflifetrust_lolt    @lightoflifetrst    lightoflifetrust    YouTube youtube.com/c/lightoflifetrust

पेटीएम वरून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला देणगी देण्यासाठी
Contribute Now ! Paytm
https://m.paytm.me/LOLT